# छंद पुष्परचनेचा - इकेबाना १




विविध रंगाची, वासाची फुले आपल्याला नेहमीच मोहात टाकतात. अगदी सहजपणे आपले मन प्रसन्न करतात. म्हणूनच बहुतेक शब्दातून भावना व्यक्त करण्यापेक्षा फुलांचे माध्यम जास्त बोलके व जवळीक साधणारे ठरते. उन्हाळ्यात वाऱ्याच्या झुळुकेबरोबर येणारा मोगऱ्याचा सुवास उन्हाने होणारी तगमग काही क्षण का होईना विसरालायला लावतो. देवाची पूजा करताना वाहिलेली विविध फुले, हार, दुर्वा पूजेची प्रसन्नता उदबत्तीच्या वासाबरोबर आजूबाजूच्या आसमंतात पसरवतात.

आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी माणसाने फुलांचे माध्यम खूप पूर्वीपासून वापरले आहे.त्यातूनच बहुदा फुलापानांची मांडणी कशी असावी याचे शास्त्र पुढे आले. फुलापानांच्या या मांडणीलाच पुष्परचना म्हणले जाते. कोणत्या प्रसंगी कोणती फुले वापरायची, त्याचे रंग कसे निवडायचे, मांडणी कशी करायची याचा विचार होऊ लागला. लाल किंवा गुलाबी रंग प्रेमाचे प्रतिक, पिवळा रंग मैत्रीचे प्रतिक, अत्युच्च आनंदाच्या प्रसंगी अनेक रंगाच्या फुलांची रचना असे अनेक पुष्परचनेचे प्रकार आपण बघतो.

भारतात हार, वेण्या, तोरणे, फुलांचे गुच्छ, फुलांची रांगोळी, लग्न-मुंजीतील फुलांची सजावट असे अनेक “पुष्परचनेचे” प्रकार रुढ आहेत. पाश्र्चात्य देशातही प्रसंगानुरुप विविध प्रकारच्या रचना केल्या जातात.




पण जपानी लोकांचा पुष्परचना (इकेबाना) खास जिव्हाळ्याचा विषय आहे. या कलाक्षेत्रात जपानी लोकांनी फर कल्पकतेने व शास्त्रशुद्ध पद्धतीने विकास केला आहे. नुसता विकास नाही तर जगभर त्याचा प्रसार करुन त्यात लोकप्रियता मिळवली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासाच्या जोडीने केलेला हा जपानी कलाप्रवास जाणून घ्यावासा वाटेल असा रंजक आहे. पुष्परचना हा जपानी संस्कृतीचा अविभाज्य घटक मानला जातो.

साधारण पाचशे ते सहाशे वर्षांपूर्वी जपानमध्ये बुद्ध मंदिरात देवाच्या पुढे सजावट किंवा देवाला फुले अर्पण करण्याच्या पद्धतीतून याचा उगम झाला. “इकेबाना” या नावाने ही कला जगभर ओळखली जाते. इकेबाना म्हणजे पानाफुलांच्या सुबक मांडणीतुन साकारलेला आविष्कार ! निसर्गाशी नाते जोडत, पानाफुलांचे सौंदर्य खुलवत व मनातील भावना व्यक्त करणारी कला म्हणजे इकेबाना!

जपानमध्ये क्योतो शहरात रोकोकूडो नावाचे सुप्रसिद्ध बुद्ध मंदीर आहे. ह्या देवळात अनेक कार्यक्रम होत असत. त्यावेळी या मंदिरातील पुजाऱ्याने प्रथम पुष्परचना करायला सुरुवात केली. या रचना देवळात येणाऱ्या भक्तांचे लक्ष वेधून घेऊ लागल्या व त्याची लोकप्रियता वाढू लागली. पुष्परचनेचे तंत्र यातूनच विकसित होत गेले व इकेनोबो स्कूलची स्थापना झाली. इकेनोबो हे पुष्परचना करणारे सर्वात पहिले घराणे मानले जाते. या मंदिराच्या शेजारीच आता इकेनोबो स्कूलची अकरा मजली इमारत आहे. आज जगामध्ये इकेनोबो स्कूलच्या अनेक देशांमध्ये शाखा आहेत. भारतात पुणे, बंगलोर, कलकत्ता अशा तीन ठिकाणी याच्या शाखा आहेत.

पुष्परचनेचा छंद जोपासायचा असेल तर त्याचे पद्धतशीर शिक्षण घेता येते. जपानी लोकांनी पुष्परचनेचे शास्त्र गणितात बसविले आहे. त्यामुळे ज्याने कधीच पुष्परचना केली नाही अशी व्यक्तीसुध्दा सहज शिकू शकते. त्यासाठी निसर्गाची आवड व पानाफुलात रमणारे मन मात्र हवे! कुठलीही कला जोपासताना त्यात सातत्य व सराव याची खूप आवश्यकता असते. त्यासाठी इकेनोबो स्कूलच्या अनेक परीक्षा देता येतात. इकेनोबो प्रमाणे इतरही अनेक स्कूल जपान मध्ये आहेत. ओहारा, सोगेत्सु अशी आणखी काही प्रसिद्ध स्कूल्स् आहेत. प्रत्येक स्कूलचे खास असे वैशिष्ठ आहे. प्रत्येक स्कूलची रचना करण्याची पद्धत थोडी वेगवेगळी आहे. पण पुष्परचनेचे मूळ तंत्र साधारण सारखेच आहे.



पाश्र्चात्य व पौर्वात्य असे पुष्परचनेचे दोन प्रकार करता येतात. पाश्र्चात्य रचनांमध्ये भरपूर फुलांचा वापर केलेला आढळतो. या रचना करताना पूर्ण रचनेचा आकार महत्वाचा मानला जातो. विविध आकारानुसार या रचनांचे विविध प्रकार  केले आहेत. रचनेचा आकार गोल,लांबट गोल,त्रिकोणी किंवा इंग्रजी 'एस्' (s) अक्षराच्या आकारात असतो.पानांपेक्षा फुलांच्या वापराला जास्त महत्व दिलेले असते. अनेक प्रकारची फुले व रंग वापरलेले असतात. प्रसंगानुसार विशिष्ट रंग व आकार विचारात घेऊन रचना करण्याची प्रथा आढळते.

पौर्वात्य किंवा जपानी इकेबाना रचना करण्याचे तंत्र पाश्र्चात्य रचनांपेक्षा खूपच वेगळे आहे. या प्रकारच्या रचना करताना फुलापानांची उंची व त्यांचा एकमेकांशी साधलेला कोन या गोष्टींना प्राधान्य दिलेले दिसते. मुख्य म्हणजे फक्त फुलेच नाही तर विविध पाने,गवत,फांद्या,वाळलेले साहित्य इ. सर्व गोष्टींनाही तितकेच महत्व दिलेले आहे. एखादेच फूल वापरुन सुद्धा सुंदर रचना करता येतात. फुलांपानांची नैसर्गिक प्रवृत्ती, प्रकाशाची दिशा, ऋतुमानानुसार पानाफुलांचा वापर अशा अनेक गोष्टींचा विचार करुन या कलेचा पद्धतशीरपणे विकास केलेला आहे. सुंदर, सुबक अशा पुष्परचना करण्यासाठी सभोवतालच्या निसर्गाशी नाते जोडून त्याला समजून घेणे जरुरीचे आहे. झाडाच्या फांद्या, पानांचे रंग, फुलांचे रंग, आकार,उमललेले फुल किती वेळ टिकते इत्यादी गोष्टींची निसर्गातील निरीक्षणे पुष्परचना करताना उपयोगी पडतात. कोणत्या पुष्परचनेला कोणते  साहित्य वापरावे याची माहिती होते. सातत्याने वेगवेगळ्या रचना वेगवेगळे साहित्य वापरुन केल्याने ही कला चांगल्या तऱ्हेने आत्मसात करता येते.

पुष्परचना करताना लागणारे साहित्य व पूर्वतयारी याची माहिती पुढील लेखात समजून घेऊ.

सौ. अरुंधती शिरीष देशपांडे   ई मेल asdssd@gmail.com

मेंबर, इकेनोबो इकेबाना फ्लोरल आर्ट,जपान

(मराठी विश्व,न्यूजर्सी यांच्या सौजन्याने)